(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेतील**

**फौजदारी अपिलीय अधिकारिता**

**रिट याचिका क्र. १५०७/२००७**

श्री. सचिन यशवंत पोकरे
वय - २७ वर्षे, व्यवसाय - नोकरी,
राहणार - द्विकृपा इमारत,
६ वा मजला, खोली क्र. ६०१,
घाटकोपर, पंतनगर, मुंबई. ...... याचिकाकर्ता

विरुद्ध

१. श्री. जयप्रकाश एम. जाधव,
सहाय्यक पोलीस आयुक्त,
वरळी विभाग, मुंबई.

२. श्री अशोक देशपारकर,
पोलीस उपायुक्त,
परिमंडळ - ३ , मुंबई.

३. महाराष्ट्र राज्य ...... उत्तरवादी

**सह**

**रिट याचिका क्रमांक १५०८/२००७**

श्री. नरेश हेरालाल राठोड
वय - २६ वर्षे, व्यवसाय - नोकरी,
राहणार - मुसा ब्रदर्स, चाळ क्र. ७७,
खोली क्र. ३६/१, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३. ...... याचिकाकर्ता

विरुद्ध

१. श्री. जयप्रकाश एम. जाधव,
सहाय्यक पोलीस आयुक्त,
वरळी विभाग, मुंबई.

२. श्री अशोक देशपारकर,
पोलीस उपायुक्त,
परिमंडळ - ३ , मुंबई.

३. महाराष्ट्र राज्य ...... उत्तरवादी

याचिकाकर्त्यांकरिता श्री. गजेंद्र जाधव.

उत्तरवादी - राज्य यांच्याकरिता श्री. एस. के. शिंदे, सरकारी अभियोक्ता सह श्री के. व्ही. सस्ते, सहा. सरकारी अभियोक्ता.

श्री. मुर्तझा नाज्मी, न्यायमित्र.

**न्यायमंच : ए. एस. ओक,**
**ए. के. मेनन आणि**
**पी. डी. नाईक, न्यान्यान्या.**

**निवेदने ऐकून घेतल्याचा दिनांक : १८ मार्च, २०१६ .**
**न्यायनिर्णय अधिघोषित केल्याचा दिनांक : १४ जून, २०१६.**

**न्यायनिर्णय (ए. एस. ओक, न्यायमूर्ती यांच्याद्वारे)**

१. या न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी दिनांक १७ ऑगस्ट, २००७ रोजीच्या आदेशान्वये, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ ( संक्षिप्ततेसाठी ' सदर अधिनियम') नुसार पारित केलेल्या हद्दपारीच्या आदेशाविरुद्ध, सदर अधिनियमाच्या कलम ६० अन्वये केलेल्या अपीलात अंतरिम दिलासा मंजूर करण्याच्या अपिलीय प्राधिकाऱ्याच्या अधिकाराच्या मुद्दा मोठ्या खंडपीठाकडे संदर्भित केला होता. विद्वान एकल न्यायाधीशांनी *शामकुमार अर्जुन दळवी विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि अन्य एक*[1] या प्रकरणातील खंडपीठाच्या निर्णयाचा संदर्भ दिला आणि सदर निर्णय विचारात घेऊन, विद्वान एकल न्यायाधीशांनी, त्यांच्या आदेशाच्या परिच्छेद ४ मध्ये खालील प्रमाणे निरीक्षण नोंदविले : -

1 १९८८ महा. एल. जे. ९५

"४.        अन्यथासुद्धा, हा प्रस्थापित कायदा आहे की, अपीलामध्ये यशस्वी होण्यासाठी सकृतदर्शनी प्रकरण असल्याच्या आधारे अंतरिम दिलासा किंवा स्थगिती आदेश मंजूर करणे आवश्यक आहे. दोषसिद्धी आणि शिक्षेच्या आदेशाविरुद्ध उद्भवलेल्या अपीलात, आपोआप जामीन मंजूर होत नाही आणि शिक्षेच्या आदेशाचे निलंबन करण्याकरिता कारणे नमूद करणे आवश्यक असते, जेणेकरून अपीलकर्त्याला जामीन मंजूर करता येईल. हद्दपारीचा कालावधी साधारणपणे एक ते दोन वर्षांचा असतो आणि सर्वसाधारण अनुभव असा आहे की, राज्य शासनाकडे केलेली अपीले एक वर्षापर्यंत सुद्धा प्रलंबित राहतात आणि या प्रक्रियेत जर अपील प्रलंबित असताना हद्दपार व्यक्तीस अंतरिम दिलासा दिला तर, हद्दपारीचा आदेश विफल होईल किंवा हद्दपारीच्या आदेशाचे सामर्थ्यच धोक्यात येईल. <u>माझ्या विचारपूर्वक मतानुसार शामकुमार प्रकरणात खंडपीठाने व्यक्त केलेला दृष्टिकोन हद्दपारीच्या आदेशाविरुद्ध केलेल्या प्रत्येक अपीलात नित्याची बाब म्हणून लागू करता येणार नाही आणि स्पष्टतेसाठी किंवा कायद्याची स्थिती अधिक स्पष्ट होण्यासाठी, अपील प्रलंबित असताना अंतरिम स्थगिती दिली पाहिजे या मुद्द्यावर तीन न्यायाधीशांद्वारे पुनर्विचार होणे आवश्यक आहे आणि म्हणून अपील शाखा नियम,</u>

<u>१९६० च्या प्रकरण - १ मधील नियम ७ नुसार पूर्णपीठ स्थापन करण्यासाठी, या दोन रिट याचिका मी माननीय मुख्य न्यायमूर्तींकडे पाठवीत आहे.</u>"

(अधोरेखित वाक्यांवर भर देण्यात आला आहे.)

२. माननीय प्रभारी मुख्य न्यायमूर्ती यांनी दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजीच्या आदेशान्वये सदर प्रकरण या पूर्णपीठासमोर सादर करण्याचे निर्देश दिले.

३. आमच्या विचारार्थ उद्भवलेला प्रश्न खालील प्रमाणे आहे :

"हद्दपारीच्या आदेशाविरुद्ध मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ६० अन्वये केलेल्या अपीलामध्ये हद्दपारीचा आक्षेपित आदेश अंमलात आणण्यास अंतरिम स्थगितीचा आदेश अर्थातच मंजूर करण्यात यावा का?"

४. याचिकाकर्त्याच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी असे सादर केले की, हद्दपारीच्या आदेशामुळे व्यक्तीच्या स्वातंत्र्यास बाधा येते, म्हणून सदर आदेशाला आव्हान देणारे वैधानिक अपील प्रलंबित असताना, सर्वसाधारण परिस्थितीत, अंतरिम स्थगिती मंजूर करणे आवश्यक आहे. त्यांनी अशी विनंती केली की, विशिष्ट शहरात किंवा विशिष्ट जिल्ह्यांत प्रवेश

न करण्यासाठी हद्दपारीचा निर्देश देणारा आदेश हा अत्यंत कठोर आदेश आहे आणि जोवर सदर आदेशाच्या वैधतेच्या मुद्द्यावर अपिलीय प्राधिकरण गुणवत्तेवर निर्णय देत नाही, तोवर तो आदेश अंमलात आणण्याची परवानगी देता येऊ शकत नाही. हद्दपारीचा आदेश हा सहा महिन्यांपासून सुरू होऊन ठराविक कालावधीकरिता आहे या बाबीकडे त्यांनी लक्ष वेधले. हा सर्वसाधारण अनुभव आहे की, हद्दपारीच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या, कलम ६० अन्वये दाखल केलेल्या अपिलावर अनेक महिने सुनावणी होत नाही आणि अपिलावर जलद गतीने सुनावणी करण्याचे निर्देश देण्यासाठी हद्दपार व्यक्तीस या न्यायालयासमोर यावे लागते ही बाब त्यांनी निदर्शनास आणली. अशा अपीलांमध्ये अंतरिम दिलासा मंजूर करण्याच्या अर्जांवर अपिलीय प्राधिकरणे अजिबात सुनावणी घेत नाहीत ही बाब त्यांनी निदर्शनास आणली. त्यांनी असे सादर केले की, अनेक प्रकरणांमध्ये अपिलीय प्राधिकरणाने अपिलांवर सुनावणी न घेतल्यामुळे अपीले निष्फळ ठरली आहेत.

५. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी अशी विनंती केली की, *शामकुमार अर्जुन दळवी* या प्रकरणात, जेथे कलम ६० अन्वये अपील दाखल केले आहे, अशा प्रत्येक प्रकरणात हद्दपारीचा आदेश अंमलात आणण्यास नित्याची बाब म्हणून स्थगिती मंजूर करायला हवी असे कायद्याचे दृढ विधान खंडपीठाने नमूद केलेले नाही. त्यांनी सदर अधिनियमाच्या कलम ६० च्या तरतुदीकडे आमचे लक्ष वेधले. त्यांनी विनंती केली की, सदर अधिनियमाच्या कलम ६० मध्ये दुरुस्ती होण्यापूर्वी कदाचित, स्थगिती देण्यासाठी अपिलीय प्राधिकरणास

कोणतेही विशिष्ट अधिकार प्रदान करण्यात आले नव्हते आणि म्हणून *शामकुमार अर्जुन दळवी* या प्रकरणातील निरीक्षणे ही त्या संदर्भात आहेत.

६. आम्ही निवेदने काळजीपूर्वक विचारात घेतली. हद्दपारीचा आदेश पारित करण्यासाठी सदर अधिनियमाच्या कलम ५५, ५६, ५७ आणि ५७ क नुसार अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सदर अधिनियमान्वये प्राधिकरणांना एखाद्या व्यक्तीला विनिर्दिष्ट क्षेत्रामधून, जिल्ह्यामधून किंवा जिल्ह्यांमधून आदेशात नमूद केलेल्या कालावधीसाठी निघून जाण्याबद्दल निर्देश देण्याचे अधिकार आहेत. सदर अधिकार निश्चितच कठोर स्वरूपाचा आहे कारण त्यामुळे ज्या व्यक्तीविरुद्ध तो आदेश केला आहे त्याचे स्वातंत्र्य बाधित होते.

७. सदर अधिनियमाच्या कलम ५५, ५६ आणि ५७ क अन्वये पारित केलेल्या हद्दपारीच्या आदेशाविरुद्ध अपील करण्याची तरतूद कलम ६० मध्ये नमूद करण्यात आली आहे आणि ती खालीलप्रमाणे आहे : -

> "**६०. अपील.** (१) कलम ५५, ५६, ५७ किंवा ५७ क या अन्वये आदेश दिल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे किंवा राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याकडे (यात यापुढे

ज्याचा निर्देश "विनिर्दिष्ट अधिकारी" असा करण्यात आला आहे) अपील करता येईल.

(२) या कलमान्वये करावयाचे अपील दोन प्रतींमध्ये ज्ञापनाच्या स्वरूपात दाखल करण्यात येईल व त्यात ज्या आदेशावर अपील करण्यात येत असेल त्या आदेशास ज्या मुद्द्यांवर हरकत घेण्यात आली असेल ते मुद्दे थोडक्यात दिलेले असतील व त्यासोबत तो आदेश किंवा त्याची प्रमाणित प्रत असेल.

(३) असे अपील मिळाल्यावर, राज्य शासन किंवा विनिर्दिष्ट अधिकारी अपील करणाऱ्या व्यक्तीस आपले म्हणणे जातीने किंवा वकील, अधिवक्ता किंवा न्यायप्रतिनिधी यांच्यामार्फत मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही चौकशी करावयाची असल्यास ती केल्यानंतर , ज्या आदेशावर अपील करण्यात आले असेल तो आदेश कायम करू शकेल, त्यात बदल करू शकेल किंवा तो रद्द करू शकेल किंवा ठरवू शकेल किंवा राज्य शासनाला किंवा अधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा निदेशांसह ते प्रकरण निकालात काढण्यासाठी परत पाठवू शकेल आणि त्याप्रमाणे स्वतःचा आदेश देऊ शकेल.

परंतु, राज्य शासन किंवा विनिर्दिष्ट अधिकारी अन्यथा निदेश देईल त्याव्यतिरिक्त, अपील निकालात काढण्यात येईपर्यंत, ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश अंमलात राहील.

स्पष्टीकरण. - या पोट-कलमांच्या प्रयोजनांसाठी, ज्या आदेशावर अपील करण्यात आले असेल त्यात बदल करण्याच्या अधिकारामध्ये, तो आदेश आस्थगित ठेवण्याच्या अधिकाराचा आणि त्या व्यक्तीला ज्या क्षेत्रातून किंवा अशा क्षेत्रातून अथवा त्या लगतच्या कोणत्याही जिल्ह्यातून किंवा त्याच्या भागातून अथवा यथास्थिती, विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांमधून निघून जाण्याचे निदेश दिले असतील अशा ठिकाणी प्रवेश करण्याची किंवा त्यामधून बाहेर जाण्याची परवानगी देण्याचा सशर्त आदेश काढण्याच्या अधिकाराचा समावेश असेल व तो नेहमीच असल्याचे मानण्यात येईल.

(४) या कलमाखालील अपिलासाठी तरतूद केलेली तीस दिवसांची मुदत मोजताना, ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची प्रमाणित प्रत देण्यास लागलेला कालावधी वगळण्यात येईल."

(अधोरेखित वाक्यांवर भर देण्यात आला आहे.)

८. पोटकलम (३) चे स्पष्टीकरण हे सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ अन्वये अंतर्भूत करण्यात आले आहे. सदर स्पष्टीकरणाद्वारे असे स्पष्ट करण्यात आले आहे की, अपील प्रलंबित असताना अपिलीय प्राधिकरणास असा आदेश आस्थगित ठेवण्याचा अधिकार आहे. पोट-कलम (३) च्या परंतुकामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, अपिलीय प्राधिकरणाने अन्यथा निदेश दिले नसल्यास, अपील निकालात काढण्यात येईपर्यंत, ज्या हद्दपारीच्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश अंमलात राहील. अशा प्रकारे, पहिले परंतुक आणि स्पष्टीकरण यांवरून असे स्पष्ट होते की, अपील प्रलंबित असताना अपिलीय प्राधिकरणास अंतरिम आदेश पारित करण्याचा अधिकार आहे. प्रत्येक प्रकरणातील तथ्यांवर अवलंबून अपिलीय प्राधिकरण पारित करू शकेल असे अंतरिम आदेश विविध स्वरूपाचे असतील. अपिलीय प्राधिकरण जे विशिष्ट प्रकारचे अंतरिम आदेश पारित करू शकेल असे आदेश आम्ही केवळ उदाहरणादाखल मांडत आहोत :

(अ) अपील निकालात काढण्यात येईपर्यंत हद्दपारीच्या आक्षेपित आदेशाच्या अंमलबजावणीस दिलेला स्थगितीचा किंवा निलंबनाचा अंतरिम आदेश.

(ब) हद्दपारीच्या आदेशात नमूद केलेल्या क्षेत्राच्या काही भागासंदर्भात हद्दपारीच्या आदेशाच्या अंमलबजावणीचे निलंबन किंवा स्थगिती.

(क) अपिलीय प्राधिकरणास योग्य वाटेल अशा शर्तींवर हद्दपारीच्या आदेशात समाविष्ट असलेल्या विशिष्ट क्षेत्रांमध्ये अपीलकर्त्यास प्रवेश करण्याची परवानगी देण्याचा अंतरिम आदेश.

(ड) हद्दपारीच्या आदेशाची विषयवस्तू असलेल्या क्षेत्रात अपीलकर्त्याला ठराविक कालावधीमध्ये प्रवेश करण्याची परवानगी देण्याचा अंतरिम आदेश.

ही केवळ उदाहरणे आहेत आणि अपिलीय प्राधिकरण पारित करू शकेल अशा अंतरिम आदेशांची परिपूर्ण यादी नाही.

९. आता आम्ही *शामकुमार अर्जुन दळवी* या प्रकरणाच्या निर्णयाकडे वळतो. सदर न्यायनिर्णयाचे परिच्छेद २ आणि ३ खालीलप्रमाणे आहेत :-

> "२. हद्दपारीच्या आक्षेपित आदेशाविरुद्ध याचिकाकर्त्याने राज्य शासनाकडे अपील दाखल केले आहे. परंतु त्यास स्थगिती नाकारली आणि म्हणून ही याचिका दाखल करण्यात आली आहे.
>
> ३. आता, जर कायद्यानुसार अपीलाची तरतूद करण्यात आली आहे आणि ते दाखल करण्यात आले आहे, तर हद्दपारीच्या प्रकरणात अपील प्रलंबित असताना, हद्दपारीस स्थगिती देणे हे न्याय्य आणि उचित आहे. ती नाकारल्यामुळे एखाद्या प्रकरणात अपीलच निष्फळ

होईल. आम्हाला असे सांगण्यात आले की, धोरणाचा भाग म्हणून स्थगिती मंजूर करण्यात आली नाही. जर असे असेल, तर ती अजून दुर्दैवी बाब आहे, कारण त्यामुळे न्यायाचा पराजय होतो. हद्दपार करण्याची आवश्यकता ही, हद्दपार करण्यात येणाऱ्या व्यक्तीसाठी न्याय्य, उचित आणि वाजवी असण्याच्या गरजेशी समतोल साधणारी अशी हवी. जर आजीवन कारावास झालेल्या दोषी व्यक्तीची जामिनावर किंवा प्रतिबंधक स्थानबद्ध व्यक्तीची पॅरोलवर सुटका होऊ शकते किंवा गंभीर आर्थिक गुन्ह्यामधील एखाद्या आरोपीस अटकपूर्व जामीनसुद्धा मंजूर होऊ शकतो, तर मग हद्दपार व्यक्तीबाबत अशी कोणती असाधारण बाब आहे की त्याला कोणत्याही परिस्थितीत स्थगिती मिळू नये? याशिवाय अपीलीय प्राधिकाऱ्याने त्यांच्यात निहीत असलेल्या स्वेच्छाधिकाराचा वापर एक धोरण म्हणून आंधळेपणाने न करता, प्रत्येक प्रकरणातील तथ्ये आणि वस्तुस्थितीवर अवलंबून तर्कसंगतपणे वापर करावा. सर्व परिस्थितीत, अपील प्रलंबित असताना, ते त्वरित निर्णीत करण्याच्या निर्देशासह, स्थगितीला मंजुरी देण्याच्या बाजूने आमचा कल आहे.

(अधोरेखित वाक्यांवर भर देण्यात आला आहे.)

१०. हे खरे आहे की, परिच्छेद ३ मधील पहिले वाक्य स्वतंत्रपणे वाचल्यास असे दिसून येईल की, खंडपीठाने असे निरीक्षण केले आहे की, जेव्हा हद्दपारीच्या आदेशाविरुध्द अपील केले जाते, अपील प्रलंबित असताना एक अनिवार्य बाब म्हणून त्या आदेशास स्थगिती देण्यात यावी. परिच्छेद ३ मधील दुसऱ्या वाक्यात असे नमूद केले आहे की, दिलेल्या प्रकरणात स्थगितीला नकार दिल्यास अपील निष्फळ ठरेल. पुढील वाक्यात असे नमूद करण्यात आले आहे की, खंडपीठास अपीलीय प्राधिकरणाद्वारा असे कळविण्यात आले की, एक धोरणविषयक बाब म्हणून स्थगिती मंजूर केली जात नाही. म्हणून खंडपीठाने असे निरीक्षण केले की, जर धोरणविषयक बाब म्हणून स्थगिती आदेश मंजूर करता येत नसेल तर ते खूपच दुर्दैवी आहे. त्यानंतर खंडपीठाने असे निरीक्षण केले की, हद्दपारीचा आदेश हा, हद्दपार व्यक्तींकरता न्याय आणि उचित आवश्यकतेसह समतोल राखणारा असावा. जर संपूर्ण परिच्छेद ३ आणि विशेषतः अधोरेखित भाग विचारात घेतले असता हे अतिशय स्पष्ट होत आहे की, पहिले वाक्य हे परिच्छेद ३ मध्ये नंतर नमूद केलेल्या तथ्यांच्या संदर्भात आहे, ते असे की, अपील प्राधिकारी हे धोरण विषयक बाब म्हणून स्थागिती मंजूर करीत नाहीत. परिच्छेद ३ मधील पुढील भागात खंडपीठाने असे निरीक्षण केले की, अपील प्राधिकाऱ्याने त्यांच्यात निहीत असलेल्या स्वेच्छाधिकाऱ्याचा वापर एक धोरण विषयक बाब म्हणून आंधळेपणाने करू नये, परंतु प्रत्येक प्रकरणातील तथ्यांवर अवलंबून तर्कसंगतपणे त्याचा वापर करावा. अशाप्रकारे, आमच्या विचारपूर्वक दृष्टीने श्यामकुमार अर्जुन दळवी प्रकरणातील खंडपीठाचा निर्णय येथे अशा अर्थाने वाचता येणार नाही कि, खंडपीठाने असे

म्हटले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ६० अन्वये हद्दपारितेच्या आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलामध्ये एक अनिवार्य बाब म्हणून हद्दपारीच्या आक्षेपित आदेशाच्या अंमलबजावणीस स्थगिती देण्यात यावी.

११. तरी कलम ६० अंतर्गत प्रलंबित असलेल्या अपीलामध्ये हद्दपारीच्या आदेशाच्या अंमलबजावणीस स्थगिती देण्यात येऊ नये, असे कोणतेही धोरण कोणत्याही प्रकरणात असू शकत नाही. वर निर्देशित केल्याप्रमाणे अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अंतरिम आदेश पारित करण्याचा अधिकार निहित असल्यामुळे, हे अपीलीय प्राधिकरणाचे कर्तव्य आहे की, त्यांनी अंतरिम दिलासा करिता दाखल अर्जावर त्वरित सुनावणी करावी. अंतरिम दिलासा देणेकरीता दाखल केलेला अर्ज विचारात घेताना, अपीलीय प्राधिकाऱ्याने प्रथमतः आक्षेपीत आदेशात कोणतीही बेकायदेशीर बाब प्रथमदर्शनी आहे का? या प्रश्नावर लक्ष दयावे लागेल. प्रथमदर्शनी, हद्दपारीचा आदेश बेकायदेशीर असल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्याचे समाधान झाल्यास, अपिलिय प्राधिकाऱ्याला योग्य तो अंतरिम दिलासा मंजूर करावा लागेल. हद्दपारीचा आदेश हा हद्दपार व्यक्तीस न्याय्य, उचित आणि वाजवी आवश्यकतेसह समतोल ठेवण्याकरीता, अपिलीय प्राधिकारी सदर दिलासा नेहमी देऊ शकेल. अशा प्रकारे कायदेशीर स्थिती अत्यंत स्पष्ट आहे. नियमाची बाब म्हणून हद्दपारीविरुद्ध केलेल्या अपीलामध्ये स्थगितीच्या अंतरिम दिलासा नाकारता येऊ शकत नाही. त्याचवेळी असे नमूद करण्यात येते की, सदर बाब अशा प्रत्येक अपीलमध्ये, अंतिम निर्णय होईपर्यंत अनिवार्य बाब म्हणून

आक्षेपित् आदेशास अंतरिम स्थगिती देण्याकरता ते कायद्याचा परिपूर्ण प्रस्ताव म्हणून मानले जाऊ शकत नाही. अंतरिम दिलासा देणेकरिता केलेली विनंती (प्रार्थना), प्रत्येक प्रकरणातील तथ्य विचारात घेऊनच निर्णीत करण्यात यावी.

१२. कलम ६० अंतर्गत प्राप्त होणाऱ्या सर्व अपीलांमध्ये तातडीचा घटक आहे. हद्दपारीच्या आदेशाचा एखादा व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर परिणाम होतो हे लक्षात घेता स्थगितीची प्रार्थना ताबडतोब किंवा अपील दाखल केल्यापासून किमान एका आठवड्याच्या आत सुनावणीसाठी घेतली पाहिजे. जर अंतरिम दिलासा दिला नाही गेला तर, शेवटी अपिलावर शक्य तितक्या शीघ्रतेने सुनावणी करणे अधिक आवश्यक आहे. जर स्थगिती दिली असेल तर, अपील शीघ्रतेने निकाली काढणे देखील आवश्यक आहे. कारण असे आहे की, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास हद्दपारीच्या आदेशाचा परिणाम अस्तित्वात राहत नाही. या न्यायालयाचे विद्वान एकल न्यायाधीश यांनी *शरद चंदनलाल जयस्वाल वि. महाराष्ट्र शासन आणि इतर*[2] या प्रकरणात असा निर्णय दिला आहे की, राज्य सरकार किंवा या न्यायालयाद्वारे हदपारीच्या आदेशास स्थगिती देण्याच्या आदेशाच्या अंमलबजावणी साठी निश्चित केलेली बाह्यमर्यादा वाढवण्याचा कोणताही परिणाम होणार नाही.

१३. आम्ही येथे हे लक्षात घेऊ शकतो की, या न्यायालयात मोठ्या संख्येने याचिका दाखल केल्या जातात, त्यामुळे एकतर कलम ६० अंतर्गत अपीलावर त्वरित सुनावणी होत

---

2 १९९२ महा.एल.जे. १२३३

नाही किंवा स्थगितीसाठीच्या अर्जावर अजिबात सुनावणी होत नाही. महाराष्ट्र शासनाने आपल्या महसूल विभागात १७ डिसेंबर २०१५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात अपील दाखल करणे, त्याची नोंदणी करणे यासाठी सविस्तर प्रक्रिया नमूद केली आहे. नोटीस कुठल्या पद्धतीने निर्गमित करण्यात यावी हे देखील त्यात नमूद केले आहे. सुनावणी संपल्याच्या तारखेपासून अंतिम आदेश कोणत्या बाह्यमर्यादेत अधिघोषित करावा हे देखील नमूद करण्यात आले आहे. अंतरिम दिलासा साठीचा अर्ज ३० दिवसांच्या कालावधीच्या आत निकाली काढण्यात येईल, अशीही तरतूद त्यात आहे. सदर कायदयाच्या कलम ६० अंतर्गत अपील दाखल करण्यासाठी आणि त्यावर सुनावणी करण्यासाठी समान प्रक्रिया निश्चित करण्याची गरज आहे. या संदर्भाची सुनावणी पूर्ण झाल्यावर विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी गृह मंत्रालयाने दिनांक २६ एप्रिल २०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची प्रत अभिलेखावर ठेवली आहे, ते अशा गरजेची काळजी घेते. त्यात अशा प्रकारचे अपील दाखल करण्यासाठी आणि हाताळण्यासाठी सविस्तर प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. त्यात अशी तरतूद आहे की, अपिल दाखल केल्यापासून ३० दिवसांच्या आत अंतरिम दिलासा मिळण्याच्या अर्जावर निर्णय घेतला जाईल. आम्ही येथे स्पष्ट करू शकतो की, स्थगितीचा अंतरिमकालीन दिलासा देण्यासाठीची प्रार्थनासुद्धा अपिलीय प्राधिकाऱ्याने अपील दाखल करण्याच्या तारखेपासून विशेषतः सात कामाचे दिवसांत त्यावर निर्णय घेतला पाहिजे.

१४. त्यानुसार, आम्ही खालीलप्रमाणे संदर्भाचे उत्तर देतो :-

(१) *शामकुमार अर्जुन दळवी* (उपरोल्लेखित) या प्रकरणात खंडपीठाने दिलेल्या निर्णयात, जेथे सदर कायद्याच्या कलम ६० अंतर्गत हद्दपारीच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आले आहे, अशा प्रत्येक प्रकरणात नित्याची बाब म्हणून स्थगिती मंजूर करायला हवी, असे कायद्याचे दृढ विधान नमूद केलेले नाही. हद्दपारीचा आक्षेपित आदेश स्थगित /निलंबित ठेवण्याचा अंतरिमकालीन दिलासा आणि अंतरिम दिलासा देण्याचा अपिलिय प्राधिकरणामधील निहित अधिकार प्रत्येक प्रकरणातील तथ्यांवर अवलंबून आहे. आम्ही असेही मानतो की, अंतरिमकालीन दिलासा किंवा अंतरिम दिलासा देण्यासाठीची प्रार्थना, सारासार विचार केल्याशिवाय, यांत्रिकपणे नामंजूर केली जाऊ शकत नाही. या न्यायालयाने नोंदविलेली निरीक्षणे विचारात घेतल्यानंतर अपिलीय प्राधिकरण प्रत्येक प्रकरणातील तथ्यांच्या आधारे, अंतरिम दिलासा देण्याचा प्रश्न विचारात घेईल.

(२) मुख्य रिट याचिका निकाली काढण्यात आल्याने, विद्वान एकल न्यायाधीशासमोर याचिका सादर करण्याची गरज नाही.

(न्या. ए. एस. ओक)

(न्या. ए.के. मेनन)

(न्या. पी. डी. नाईक)

x-x-x-x

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x